महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ◆१९ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०८७ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024





# पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त लहान मुलांवर मोफत हृदयशस्त्रक्रिया




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्ताने, राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, सिद्धिविनायक हॉस्पिटल, ठाणे व शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत लहान मुलांच्या हृदयाचे शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. या आरोग्य शिबिराचे उद्धाटन भाजपा ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संदीपजी लेले यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी शिबिरात सहभागी झालेल्या नागरिकांना व लहानग्यांना दिलासा मिळावा यासाठी विविध वैद्यकीय तपासण्या पार पाडण्यात आल्या. या शिबिराला राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाशजी आंबिटकर तसेच राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर मॅडम यांनी व्हिडिओ कॉलद्वारे शुभेच्छा देऊन उपक्रमाचे कौतुक केले. समाजाच्या आरोग्य रक्षणासाठी अशा प्रकारचे उपक्रम सतत राबवले जावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**शिबिरासाठी सातत्याने परिश्रम घेणारे आरोग्यदूत मंगेश चिवटे तसेच सिद्धिविनायक हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ.अमोलजी गीते सर यांच्या कार्याचे मान्यवरांनी विशेष अभिनंदन केले. शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व सिद्धिविनायक हॉस्पिटल यांच्या या उपक्रमामुळे गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना मोठा आधार मिळत असून, हा उपक्रम समाजाप्रती असलेली खरी सामाजिक बांधिलकी आणि मानवीयतेचे द्योतक ठरला आहे.**

# शहापुरात अग्निशामक वाहन दाखल !

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**शहापूर ( नरेंद्र पाटील)**

शहापूरात अत्यावश्यक असलेल्या अग्निशामक वाहन उपलब्ध झाले असून या वाहनांचे लोकार्पण राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

शहापूर नगरपंचायतीमध्ये मोठ्या क्षमतेच्या अग्निशामक वाहनाची गरज होती. शहराची वाढती लोकसंख्या, नागरी वस्त्या तसेच औद्योगिक वसाहती लक्षात घेता ही आवश्यकता अत्यंत गरजेची होती. ही गरज लक्षात घेऊन जिजाऊ संघटनेचे शहापूर विधानसभा प्रमुख व शिवसेना नगरसेवक हरेश पष्टे यांनी या मागणीचा सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता.

सदर, मागणीच्या अनुषंगाने जिल्हा नियोजन समिती व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने हि समस्या मार्गी लागली आहे. अत्यावश्यक व मोठ्या क्षमतेच्या असलेल्या हे अग्निशामक वाहन उपलब्ध झाले आहे. तर या वाहनामुळे आपत्कालीन परिस्थितीत विशेषतः आग लागल्याच्या घटनावेळी वेळेत व अत्यावश्यक मदत होणार आहे. तर गेल्या तीन ते पाच वर्षांपासून मी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुरावा व अथक प्रयत्नांचे फळ अखेर शहापुरकरांच्या सुरक्षिततेच्या रूपाने मिळल्याने समाधान वाटत असल्याचे हरेश पष्टे यांनी म्हटले आहे. खोणी (कल्याण ) येथे झालेल्या या लोकार्पण प्रसंगी शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख मारुती धिर्डे, नगराध्यक्षा गायत्री भांगरे, उपनगराध्यक्ष व शिवसेना शहरप्रमुख विजय भगात, नगरसेवक आनंद दळवी, आनंद झगडे, शिवसेना युवा नेते बुवा अधिकारी, नगरपंचायतीच्या गटनेत्या कामिनीताई सावंत, मुख्य अधिकारी शिवराज गायकवाड, पाणीपुरवठा व अग्निशामक विभागाचे प्रमुख अधिकारी रुपेश कोंडे, पाणीपुरवठा समिती सभापती अजित भोईर, आदी नगरसेवक, शिवसैनिक, नगरपंचायत कर्मचारी, स्थानिक नागरिक उपस्थित होते.





# वाड्यात भव्य रोजगार मेळावा संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाडा** : जिल्हा कौशल्य विकास रोजगार, उद्योजकता मार्गदर्शन केंद्र पालघर व स्वामी विवेकानंद आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज वाडा यांच्या संयुक्त विद्यमाने वाडा येथील स्वामी विवेकानंद विद्यामंदिर येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. विद्यामंदिराच्या नूरबाग सभागृहात ह्या मेळाव्याचे आयोजन केले होते. ह्या मेळाव्यात तरुणांना रोजगार उपलब्ध करण्यासाठी परिसरातील एकूण १७ कंपन्यांनी सहभाग नोंदवला असून एकूण तीनशे उमेदवारांनी नाव नोंदणी केली. कार्यक्रमासाठी पालघर जिल्हा कौशल्य विकास रोजगार सहाय्यक आयुक्त रेणुका तम्मलवार, शिक्षक संचलित शिक्षण संस्थेचे सरचिटणीस विशाल कुलकर्णी, कोषाध्यक्ष जगदीश चित्ते, मुख्याध्यापक सुनिल पाडवी, सुरेंद्र खांडेकर, रोहन चुबळे, रमेश मोरे, किरण साळवे यांसह तालुक्यातील युवक युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुरबाड शहराच्यावतीने आमदार किसन कथोरेंचा वाढदिवस सोहळा साजरा




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरेंचा वाढदिवस मुरबाड शहरातील सर्व समाज संघटना, समाज बांधव व आमदार साहेबांचे समर्थक व कार्यकर्ते यांच्या कडून मोठ्या उत्साहात कुणबी समाज भवन येथे साजरा करण्यात आला. आमदार कथोरेंवर प्रेम करणारे सर्वच समाज घटकांनी यावेळी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

मुरबाड शहरात प्रथमच अशा स्वरुपाचा वाढदिवस साजरा झाला असून या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी नगराध्यक्ष मोहन सासे यांनी केले.तर कुणबी समाज संघटनेचे ता.अध्यक्ष गणपत विशे,भाजपा मा.शहराध्यक्ष सुधिर तेलवणे,हरेश पुरोहित,नगरसेविका मधुरा सासे यांनी आमदार महोदयांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी आमदार कथोरे यांनी मार्गदर्शन करताना भावुक होत मी माझ्या आयुष्यात फक्त तुमच्या सारखी प्रेम करणारी माणसे कमावली आहेत हीच संपत्ती आहे.तर मुरबाड शहरासाठी अजून बरेच काही करायचे आहे. नविन पाणी योजना रखडली होती परंतु तीचा मार्ग देखील मोकळा झाला असून भविष्यातील मुरबाड करांचा पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. त्याच बरोबर शहरातील सांडपाण्याची योग्य व्यवस्था होण्यासाठी 145 कोटी निधी भुयारी गटारांसाठी मंजूर करून घेतले असल्याचे यावेळी सांगितले. तर तालुक्यातील होऊ घातलेले सर्व मोठे प्रकल्प कोणी कीतीही वल्गना केल्या तरी निश्चितच पुर्ण होतील .

सरळगाव एम.आय.डी.सी. चा विषय मार्गी लावून येथिल तरूणांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होणार असून भविष्यात मुरबाड हे जगाच्या नकाशावर येणार असल्याचे सुतोवाच त्यांनी या प्रसंगी करून अशा प्रकारे सर्व समाज घटक एकत्र येऊन वाढदिवस साजरा केल्या बद्दल आयोजकांचे त्यांनी आभार मानले. यावेळी आमदार महोदयांना शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या संख्येने शहर व तालुक्यातील सर्व समाज घटक उपस्थित होते.

# आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांसाठी गोवर रुबेला लसीकरण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**शहापूर ग्रामीण :**

वासिंद येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत असलेल्या आदिवासी आश्रमशाळांमधील मुलांसाठी गोवर रूबेला विशेष लसीकरण मोहीम कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग वतीने ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. वासिंद येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत असलेल्या शासकीय इंग्लिश माध्यमिक आश्रम शाळा सावरोली येथे ही मोहीम घेण्यात आली. यामध्ये येथील 248 विद्यार्थ्यांना लसीकरण देण्यात आले असून उर्वरित दहागांव व भातसई येथेही हा उपक्रम राबविला जाणार असल्याचे आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रुपाली शेडगे यांनी सांगितले.

या लसीकरणावेळी जागतिक आरोग्य संघटना प्रतिनिधी डॉ. विनायक जळ गावकर, प्रा. केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रूपाली शेडगे, आवाळे उपकेंद्राच्या समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. योगिनी निरवारे, आसनगाव उपकेंद्राच्या डॉ. सुधा कोळी, सायन हॉस्पिटल मुंबई येथील डॉ.श्वेतांगी शिंदे, डॉ.नटवर शिंगारे, डॉ. अल्ड्रिन थॉमस, आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका शुभांगी पाटील, शिक्षिका भाग्यश्री भोईर प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचारी आदीजण उपस्थित होते.

या कार्यक्रमा दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 75 व्या वाढदिवसानिमित्त डॉक्टर रूपाली शेडगे यांनी संस्कृत मध्ये शुभेच्छा देऊन व केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. तसेच प्रा. केंद्राच्या व आश्रमशाळा महिला कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करण्याविषयी सल्ला देण्यात आला तर 20 सप्टेंबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्रात स्वस्थ नारी सशक्त परिवार हा आरोग्य शिबीर घेण्यात येणार असल्याचे शेडगे यांनी म्हटले.

# वासुंद्री रोडवर कचऱ्याचा थर

## प्लास्टिकमुळे जनावरांच्या जीवाशी खेळ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**टिटवाळा** : मांडा-टिटवाळा येथील वासुंद्री रोडवर प्रचंड प्रमाणात साचलेल्या कचऱ्यामुळे परिसर अस्वच्छतेने व्यापला असून, या कचऱ्यावर गुरे-ढोरे चक्क प्लास्टिकच्या पिशव्या आणि कुजलेल्या अन्नपदार्थांवर उपाशीपोटी तुटून पडताना दिसत आहेत. हे दृश्य केवळ अस्वच्छतेचे नाही, तर जनावरांच्या जीवाशी खेळणारे आणि मानवी आरोग्यासाठी धोकादायक असे आहे.



**प्लास्टिक जनावरांच्या जीवाला घातक**

रस्त्याच्या कडेला पडलेला कचरा उचलण्यासाठी नगरपालिका निष्क्रिय बसली असून, यामुळे निरपराध जनावरे प्लास्टिक खाऊन हळूहळू मृत्यूकडे ढकलली जात आहेत. पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, प्लास्टिक पोटात गेल्यानंतर ते पचत नाही आणि आतड्यांमध्ये अडथळा निर्माण करून गंभीर आजार व मृत्यू घडवते. अशा प्रकारे उपाशीपोटी कचऱ्यातून अन्न शोधणारी ही जनावरे आपल्याच डोळ्यांसमोर मृत्यूच्या खाईत लोटली जात आहेत.

**नागरिकांचे आरोग्यही धोक्यात**

या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डास, माशा आणि इतर कीटकांचा प्रादुर्भाव वाढला आहे. डेंग्यू, मलेरिया, कॉलरा यांसारख्या आजारांचा फैलाव होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्यात कचरा कुजल्यामुळे रस्त्यांवरून जाणाऱ्यांना श्वास घेणेही मुश्किल होत आहे.

**नागरिकांचा संताप — प्रशासनाकडे दुर्लक्षाचा आरोप**

स्थानिक नागरिकांनी अनेकदा संबंधित प्रशासनाकडे तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप केला आहे. “रोज या रस्त्याने शाळकरी मुले, नागरिक, ज्येष्ठ मंडळी प्रवास करतात. कचऱ्याच्या दुर्गंधीने जगणे कठीण झाले आहे. नगरपालिका केवळ कर वसूल करण्यात व्यस्त असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न दुर्लक्षित करत आहे,” असा नागरिकांचा संताप व्यक्त होत आहे.

**तातडीने कारवाईची मागणी**

या परिस्थितीत येथील नागरिक मिलिंद भाटकर, दीपक उबाळे चामुंडा शॉपचे मालक तोलाराम यांनी नगरपालिका प्रशासनाला तातडीने स्वच्छता मोहीम राबवण्याची मागणी केली आहे. तसेच जनावरांना प्लास्टिकपासून वाचवण्यासाठी योग्य व्यवस्था करून, कचरा व्यवस्थापनात शिस्त आणावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र शासन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी तर्फे रायगड जिल्ह्यात अमृत मेळावा संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

पेण (प्रतिनिधी) महाराष्ट्र शासन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) तर्फे खुल्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचावा या उद्देशाने राज्यातील विविध तालुक्यांमध्ये मेळाव्यांचे आयोजन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील अमृत मेळावा कार्यक्रम पेण येथील पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने सभागृहात 14 सप्टेंबर रोजी संपन्न झाला असल्याची माहिती जिल्हा व्यवस्थापक शैलेश मराठे यांनी दिली आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पेण एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष बापूसाहेब नेने उपस्थित होते. तसेच बँक ऑफ इंडिया, पेण शाखेचे व्यवस्थापक सौरभ पणशीकर व अमृतचे कोकण विभागीय व्यवस्थापक अमित सामंत हे उपस्थित होते.

या प्रसंगी अमित सामंत यांनी अमृत संस्थेच्या सर्व योजनांची सविस्तर माहिती उपस्थित नागरिकांना दिली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्तींनी उपलब्ध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. "एकमेका साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ या विचाराला अनुसरून, संस्थेच्या लक्षित गटातील लाभार्थ्यांना योजनांची माहिती देऊन आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून योजनेचा संपूर्ण लाभ मिळवून देणे हे आपले कर्तव्य आहे, असे मत श्री.सामंत यांनी व्यक्त केले.

मेळाव्याचे निमंत्रक मंगेश नेने यांनी सभागृह व अल्पोपहार व्यवस्थापनाची उत्तम जबाबदारी पार पाडली. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर व रायगड जिल्हा सहव्यवस्थापक यांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल रायगड जिल्हा व्यवस्थापक शैलेश विनायक मराठे यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे बापूसाहेब नेने यांनी आपल्या विचारांचे सादरीकरण केले. त्यानंतर बँक ऑफ इंडिया, पेण शाखेचे व्यवस्थापक सौरभ पणशीकर यांनी बँकेच्या माध्यमातून लक्षित गटाला कोणत्या प्रकारे सहकार्य करता येईल तसेच अमृत संस्थेच्या योजनांचा लाभ कसा घेता येईल याबाबत आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल रायगड जिल्हा व्यवस्थापक शैलेश विनायक मराठे व सहव्यवस्थापक मंगेश देबे यांनी ब्राह्मण सभा अध्यक्ष महेश हेलवाडे तसेच निमंत्रक मंगेश नेने यांचे मनः पूर्वक आभार मानले.




# भविष्यवेध



**शुक्रवार १९ सप्टेंबर २०२५**

**मेष**
जे लोक बऱ्याच दिवसापासून खूप व्यस्त होते त्यांना आज स्वतःसाठी वेळ मिळू शकतो. वाचनात भर द्यावी.

**वृषभ**
वादविवाद किंवा कार्यालयातील राजकारण, तुम्ही या सगळयाला पुरून उराल. चिंता करुन दिवस जाईल.

**मिथुन**
चांगल्या स्पा मध्ये जाऊन तुम्हाला ताजेतवाने वाटू शकते. यश हातातोंडाशी येण्याची शक्यता

**कर्क**
आपली ताकद कमी होत जाण्याची भावना निर्माण होईल. निराशाजनक आर्थिक परिस्थितीमुळे नैरास्य येईल.

**सिंह**
काही महत्त्वाच्या कामामध्ये खंड पडू शकतो. घरगुती कामं बराच काळ व्यस्त ठेवतील. अनपेक्षित योग येतील.

**कन्या**
धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. मंदिरात जाऊन पुजाअर्चा कराल.

**तुळ**
अनियोजित माध्यमातून मिळणारे पैसे तुमचा दिवस उजळून टाकतील. भाऊ गरजेच्या वेळी उत्तम पाठिंबा देऊ करेल.

**वृश्चिक**
तुमचे आवडते छंद जोपासण्यासाठी किंवा तुमच्या आवडीच्या गोष्टींचा आनंद लुटण्यासाठी वेळ खर्च करा.

**धनु**
अधिकचा पैसा स्थावर जंगम मालमत्तेत गुंतवा. कुटुंब-मुले आणि मित्रमंडळी यांच्यासमवेत वेळ घालवाल

**मकर**
तुमच्या मनाला पुन्हा एकदा उभारी मिळेल. व्यक्तिमत्व सुधारण्यावर केलेल्या प्रयत्नांचे फळ मिळेल.

**कुंभ**
जीवनसाथी सोबत एक कँडल लाइट डिनर सप्ताहाच्या थकव्याला दूर करेल. मित्रांसोबत गप्पा होतील.

**मिन**
सतत फोनवर गप्पा मारणे डोकेदुखी होण्याची शक्यता आहे. धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करणारा दिवस.

महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ १९ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक - ०८७ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत ०२ रुपये

लक्षवेधी

## अंबरनाथ नगर परिषदेची अतिक्रमणांवर कारवाई



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ** : पदपथ, कल्याण बदलापूर राज्यमार्ग आणि पालिकेच्या आरक्षित भूखंडांवरील अतिक्रमणे अंबरनाथ नगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने गुरूवारी जमिनदोस्त केले. यावेळी अनधिकृत बांधकामे आणि फुटपाथावरील टपऱ्यांवरही कारवाई करण्यात आली. शहरातील

मुख्य रस्ते आणि आरक्षणाच्या जागांवर वाढलेले अतिक्रमण नागरिकांच्या गैरसोयीचे ठरत असल्याने प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. मात्र यातून सण उत्सवांच्या निमित्ताने रस्ते अडवणाऱ्यांना सोडण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त होते आहे. गेल्या काही महिन्यात अंबरनाथ शहरात अतिक्रमणांची संख्या वाढल्याचे दिसून आले आहे.

पदपथांवर फेरिवाले, विक्रेत्यांनी बस्तान मांडले आहे. तर महत्वाच्या चौकात, रस्त्याच्या कडेलाही अतिक्रमणे वाढल्याचे दिसून आले होते. शहरातून जाणारा आणि वाहतुकीसाठी महत्वाचा असलेला कल्याण बदलापूर राज्यमार्गही यातून सुटला नव्हता. राज्यमार्गावर विविध ठिकाणी अतिक्रमणे झाल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे या अतिक्रमणांवर कारवाई करावी अशी मागणी केली जात होती. मात्र त्यावर कारवाई केली जात नव्हती. अखेर गुरूवारी अंबरनाथ नगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी विभागाच्या वतीने अंबरनाथ शहरातील विविध भागातील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली.

## शहापूर तालुक्यात २५ जणांना गॅस्ट्रोची लागण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : शहापूर तालुक्यातील चक्कीचापाडा येथील २५ हुन अधिक रुग्णांना गॅस्ट्रोची लागण झाली असल्याचे प्रकार गुरूवारी उघडकीस आला. ग्रामस्थांना उलट्या आणि अतिसाराचा त्रास होऊ लागल्याने त्यांनी अघई आणि शहापुर उपजिल्हारुग्णालयात धाव घेतली. दरम्यान, गॅस्ट्रोची लागण झालेल्या रुग्णांना तात्काळ उपचार मिळावेत यासाठी चक्कीचापाडा येथे आरोग्य पथक तैनात करण्यात आले. दूषित पाण्यामुळे गॅस्ट्रोचा त्रास झाला असल्याचा प्राथमिक अंदाज असल्याने पाण्याचे नमुने तपासणीसाठी शहापुर आणि ठाणे जिल्हारुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. शहापुर तालुक्यातील अघई प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत चक्कीचा पाडा येतो. या ठिकाणी - आदिवासी नागरिकांची २३ घरे आहेत. तेथील ग्रामस्थांना गेल्या दोन दिवसांपासून पोटदुखीचा तसेच अचानक उलट्या आणि अतिसाराचा त्रास सुरू झाला. यामध्ये बहुतांशी महिला होत्या. त्यांनी अघई प्राथमिक आरोग्य केंद्रात धाव घेतली असता गॅस्ट्रोची लागण झाल्याचे उघडकीस आले.

# ‘हैदराबाद गॅझेट’ विरोधातील याचिका फेटाळली



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

'हैदराबाद गॅझेट'च्या अंमलबजावणीला मान्यता देणाऱ्या शासन निर्णयाच्याविरोधात दाखल झालेली पहिली जनहीत याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळाली आहे. या याचिकेवर आज सुनावणी पार पडली. २ सप्टेंबरच्या शासन निर्णयाविरोधातील ही याचिका वकील विनीत धोत्रे यांनी दाखल केली होती. मुंबई उच्च न्यायालयने सुनावणीवेळी निर्णय देताना ही याचिका जनहीत याचिकेच्या कक्षेत येत नसल्याचं निरीक्षण नोंदवलं आहे. तसेच २ सप्टेंबरच्या शासन निर्णयाला जनहीत याचिकेद्वारे आव्हान देण्यात आलं असून, यासंदर्भातील जनहीत याचिका ऐकण्याची आवश्यकता नाही, असं न्यायालयाने म्हटलंय. परंतु याचिकाकर्त्यास रीट याचिका म्हणून सक्षम कोर्टासमोर दाद मागण्याचीही मूभा दिली गेली आहे.

> ” आम्ही सांगितलं होतं जनहित याचिका नको, रिट याचिका करा, आतापर्यंत आम्ही 4-5 रीट याचिका केल्या आहेत. असं यावेळी भुजबळ यांनी म्हटलं आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की जीआर मागे घ्या किंवा सुधारणा करा अशी आमची मागणी आहे. आम्हाला यश मिळेल अशी खात्री आहे. आरक्षणाचा पाया आर्थिक विषयावर नाही, सामाजिक मागासलेपणावर आहे. आमचीही लेकरंबाळंच आहेत, ओबीसी जात नाही अनेक जातींचा समूह आहे, असं यावेळी भुजबळ यांनी म्हटलं आहे.

# भिवंडी मनपा प्रभाग रचनेच्या ८४ हरकती सुचनांवर सुनावणी संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 करिता प्रारुप प्रभाग रचनेसंदर्भात प्राप्त झालेल्या एकूण 84 हरकती सुचनांवर आज मीरा भाईंदर महानगर पालिकेचे प्रशासक तथा आयुक्त राधाबिनोद शर्मा यांच्या उपस्थितीत सुनावणी घेण्यात आली.यावेळी विविध पक्षाचे इच्छुक उमेदवारांनी पालिकेत मोठी गर्दी केली होती.




भिवंडी महानगर पालिका कार्यक्षेत्रात सार्वत्रिक निवडणूकीचे पडघम वाजू लागले असुन शिवसेना, भाजप, काँग्रेस, समाजवादी, राष्ट्रवादी काँग्रेस व मनसे पक्षाच्यावतीने जोरदार मोर्चा बांधणी सुरू झाली आहे.महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी 2011च्या जनगणनेच्या आधारे लोकसंख्या प्रमाण मानून प्रभाग रचना बनवण्यात आली आहे.जाहीर करण्यात आलेल्या प्रभाग रचनेत एकुण 23 प्रभागात 90 सदस्य असणार आहेत. आगामी निवडणुकीसाठी 2017 मध्ये बनविण्यात आलेली प्रभाग रचना कायम ठेवत काही ठिकाणी सीमांकना मधील नांवा मध्ये बदल झालेले आहेत.त्यामुळे शासन आदेश नुसार हरकती सुचना मनपा आयुक्तांनी मागविण्यात आल्या होत्या त्यानुसार शासनाने प्रशासक तथा आयुक्त राधाबिनोद शर्मा यांना प्राधिकृत केले होते.

आज दुपारी शर्मा यांचे अध्यक्षतेखाली अनमोल सागर यांचे उपस्थितीत झालेल्या सुनावणीस 68 हरकतदार उपस्थित होते. सदर सुनावणी दरम्यान सर्व 84 हरकती व सुचनांवर सुनावणी पुर्ण करण्यात आल्याची माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली. सदर सुनावणी अहवाल जिल्हाधिकारी ठाणे व राज्यशासन यांचेमार्फत राज्य निवडणूक आयोगास पुढील कार्यवाहीस्तव सादर केला जाणार असल्याची माहिती देण्यात आली. या सुनावणीस महापालिकेचे माजी महापौर जावेद दळवी, माजी उप महापौर इमरान खान यांच्यासह इच्छुक उमेदवार, माजी नगरसेवक उपस्थित होते.

## ‘स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका महायुती बहुमताने जिंकेल – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका महायुतीने जिंकल्या. त्यापाठोपाठ आता विकास कामांच्या जोरावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती बहुमताने जिंकले आणि मुंबई महापालिकेतही महायुतीचीच सत्ता येईल, असा दावा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरूवारी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना केला. यावेळी त्यांनी राहुल गांधी यांच्यावरही टिका केली.

ठाण्यातील टेंभीनाका येथील दुर्गेश्वरी देवीच्या मंडपाची पाहाणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आणि यानंतर ते आनंदाश्रम येथे गेले. तिथे पालघर जिल्ह्यातील ठाकरे गटाच्या अनेक पदाधिकाऱ्यांचा पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. यामध्ये ठाकरे गटाच्या महिला जिल्हा प्रमुख, शहर महिला संघटक, विभाग प्रमुख, शाखा प्रमुख, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपतालुका प्रमुख आदींसह इतर पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. यानंतर शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात मुंबईत रस्ते, एसटीपी, वैद्यकीय सुविधा, स्वच्छता, मेट्रो, कारशेड यांसारखे विषय आम्ही मार्गी लावले. क्लस्टर धोरणाद्वारे मुंबईबाहेर गेलेले मुंबईकर

पुन्हा शहरात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. सिडको, एमआयडीसी, एमएसआरडीसी आणि मुंबई महापालिका यांच्या मदतीने रखडलेले प्रकल्प गतीमान केले जात आहेत, असे शिंदे म्हणाले.

# कल्याणकरांची वाहतूक कोंडीतून सुटका कधी ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
बातमीदार

**कल्याण**-कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीत रस्त्यावरील वाहतूक कोंडीने रस्ते जाम होत आहेत. या वाहतूक कोंडीने नागरीकांसह, प्रवासी, वाहन चालकांना त्रास सहन करावा लागला. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक नियोजनाचा अभाव आहे. रस्त्यावर पडलेले खड्डे आणि मेट्रोचे सुरु असलेले काम ही वाहतूक कोंडी होण्यासाठी प्रमुख कारणे आहे. त्यावर ठोस उपाययोजना केल्या जात नाहीत, तोपर्यंत या वाहतूक कोंडीतून सुटका होणे अशक्य आहे असचं म्हणावं लागेल. कल्याण डोंबिवलीतील नागरीकांना सतत वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. कल्याण पश्चिमेतील सहजानंद चौक, लाच चौकी, छत्रपती शिवाजी महाराज चौक, एपीएमसी मार्केट या भागात गुरुवारी ही वाहतूक कोंडी पाहावयास मिळाली. त्याचबरोबर कल्याण शीळ रस्त्यावर वाहतूक कोंडी होती. कल्याण पूर्वेतील चक्कीनाका, नेतिवली नाका, मलंग रोड, पूना लिंक रोड यावरही वाहतूक कोंडी होती. या वाहतूक कोंडीत अनेक वाहने अडकून पडली होती. पावसामुळे रस्त्यावर पडलेले खड्डे हे वाहतूक कोंडी होण्यास प्रमुख कारण आहे. हे खड्डे पावसाळ्यात बुजवले नाहीत. त्याचा हा परिणाम म्हणता येईल. कल्याण स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत स्टेशन परिसर विकासाचे काम सुरु आहेत. त्यामुळे स्टेशन परिसरात वाहतूक कोंडी होते.

> या वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका, शाळेच्या बसेस अडकून पडतात. तसेच अनेक चाकरमान्यांना बसने प्रवास करताना त्यांच्या कार्यालयात वेळेवर पोहचता येत नाही. या वाहतूक कोंडीमुळे नागरीक, वाहनचालक हैराण झाले आहे. वाहतूक कोंडी सोठविण्यासाठी वाहतूक नियोजनाचा अभाव असल्याने त्याचा मनस्ताप सगळ्यांनाच सहन करावा लागतो.

## संजय राऊतांच्या वक्तव्याविरोधात शिवसैनिकांचा संताप



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यामध्ये ९० च्या दशकात ठाणे शहरांपासून ते थेट वाडा मोखाड्याच्या पाड्यापर्यंत शिवेसना पोहोचवण्याचे काम करणारे दिवंगत शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांचे २३ वर्षांपूर्वी निधन झाले असले तरी त्यांचा मोठा चाहता वर्ग आजही कायम आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांना ठाण्यातील शिवसैनिक गुरू मानतात त्याच आनंद दिघे यांच्याविषयी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांनी वादग्रस्त विधान केले. त्याचे पडसाद ठाण्यात उमटू लागले आहेत. ठाण्यातील शिंदेच्या शिवसेनेतील शिवसैनिक संतप्त होत राऊत यांची प्रतिमा जाळून निषेध नोंदविला.

ठाणे जिल्ह्यामध्ये ९० च्या दशकात ठाणे शहरांपासून ते थेट वाडा मोखाड्याच्या पाड्यापर्यंत शिवेसना पोहोचवण्याचे काम करणारे दिवंगत शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांचे २३ वर्षांपूर्वी निधन झाले. पण, ते हयातीत असतानाही त्यांचा मोठा चाहता वर्ग होता आणि तो निधनानंतरही कायम असल्याचे चित्र सातत्याने दिसून येते. त्यांच्या नावाचा करिष्मा आजही कायम असल्याचे निवडणुकीत दिसून येतो. शिवसेनेत दोन गट पडले पण, दोन्ही गटातील नेते आणि शिवसैनिक मात्र दिघेंना गुरुस्थानी मानतात. शिवसेना म्हणजे ठाणे आणि ठाणे म्हणजे आनंद दिघे असे जणू समिकरणच तयार झाले होते. यातूनच 'शिवसेनेचा बालेकिल्ला... आनंद दिघंचा ठाणे जिल्हा' अशी घोषणा उदयास आली होती. शिवसैनिकांमध्ये त्यांच्याविषयी आदरयुक्त भीती होती. दिघे यांच्याविषयी ठाण्यातील शिवसैनिकांमध्ये नितांत आदर असून यातूनच संजय राऊत यांनी दिघे यांच्याविषयी केल्या वादग्रस्त विधानानंतर त्याचे पडसाद ठाण्यात उमटू लागले आहेत. ठाणे लोकसभा प्रमुख मनोज शिंदे, ठाणे शहर प्रमुख हेमंत पवार, युवा सेनेचे पदाधिकारी नितीन लांडगे यांच्यासह शिवसैनिकांनी राऊत यांच्या प्रतिमेचे टेंभीनाका येथे दहन करत निषेध नोंदविला.






# शिष्यवृत्तीच्या विद्यार्थ्यांना दिलासा

## वारंवार माहिती देण्याची आवश्यकता नाही



शिष्यवृत्तीसाठी एकदा विद्यार्थ्यांकडून माहिती अपलोड केल्यानंतर नव्याने माहिती घेण्याची आवश्यकता नाही, यासाठी संबंधित विभागांनी सुक्ष्म नियोजन करावे. यामुळे शिष्यवृत्ती अर्जाच्या छाननीसाठी लागणाऱ्या वेळेची बचत होण्याबरोबरच प्रवेशित विद्यार्थ्यांचा अचूक डेटाही उपलब्ध होईल.

**- चंद्रकांत पाटील**
उच्च व तंत्र शिक्षणमंत्री

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थी उत्पन्नांचा दाखला, वैयक्तिक माहिती व कागदपत्रे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व तंत्रशिक्षण संचालनालया सादर करातात. या कागदपत्रांची पडताळणी प्रक्रिया पूर्णतः ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने करण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी एकदा उत्पन्नाचा दाखला दिल्यानंतर अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यत शिष्यवृत्तीसाठी वारंवार माहिती देण्याची आवश्यकता नाही. प्रवेशाच्या वेळी दिलेली माहिती ग्राह्य धरावी, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, आर्थिक दुर्बल घटक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग आणि इतर सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम शैक्षणिक संस्थांना आणि विद्यार्थ्यांना वेळेत मिळावी यासाठी कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेशिवाय अन्य अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी महाडीबीटी पोर्टलवर कागदपत्रे अपलोड करावी लागतात. शिष्यवृत्तीसाठी एकदा विद्यार्थ्यांकडून माहिती अपलोड केल्यानंतर नव्याने माहिती घेण्याची आवश्यकता नाही, यासाठी संबंधित विभागांनी सुक्ष्म नियोजन करावे. यामुळे शिष्यवृत्ती अर्जाच्या छाननीसाठी लागणाऱ्या वेळेची बचत होण्याबरोबरच प्रवेशित विद्यार्थ्यांचा अचूक डेटाही उपलब्ध होईल. परिणामी, विद्यार्थ्यांनाही वांरवार तीच माहिती द्यावी लागणार नाही. त्यामुळे त्यांच्या शिष्यवृत्ती मिळण्यातील टप्पे कमी होतील, असे चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

# भिवंडी महापालिकेच्यावतीने बुध्दीबळ स्पर्धाचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
भिवंडी (प्रतिनिधी)

कोणताही खेळ खेळताना खेळाडूंनी एकाग्रता राखून खेळ खेळावा त्यातून आपल्याला विजय मिळवता येतो, बुद्धिबळ हा खेळ जरी बुद्धीचा वापर करून खेळला जातो असे असले तरी आपण खेळ खेळतात शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे, बुद्धिबळातून आपण मनाची एकाग्रता साधणे आवश्यक आहे. खेळाडूंमध्ये हार जीत होणे अपेक्षित आहे, पण खेळात सहभागी होणे हेच सगळयात महत्त्वाचे आहे असे मत भिवंडी महापालिकेचे आयुक्त अनमोल सागर यांनी भिवंडीत आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.

शासनाचे क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे संचलित निर्देशीत

भिवंडी शहर महानगरपालिकेच्या माध्यमातून जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन शहरातील कोंबडपाडा येथील पालिकेच्या स्व.गाजेंगी सभागृहात करण्यात आले होते आयोजित स्पर्धेचे उद्घाटन महानगर पालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात करण्यात आले.यावेळी व्यासपीठावर मनपा क्रिडा विभागाचे उपायुक्त विक्रम दराडे, शिक्षण विभागाचे उपायुक्त बाळकृष्ण क्षिरसागर,क्रिडा विभाग प्रमुख मिलिंद पळसुले, क्रीडा अधिकारी शरद कलावंत, ठाणे जिल्हा बुद्धिवळ संघटनेचे मोहित लाडे व अन्य बुद्धिबळ क्रीडापटू, संघटनेचे पदाधिकारी व शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.मैदानी अथवा बुद्धिबळा सारखे खेळ असो त्यामध्ये आपले शारीरक स्वास्थ्य चांगले असणे आवश्यक आहे त्यासाठी दररोज व्यायाम व इतर बुध्दीला चालना देणारे छंद बाळगणे आवश्यक आहे त्यामुळे आपला विजय साध्य होत असतो असे मत आयुक्त सागर यांनी व्यक्त करून उपस्थित खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

महापालिका आयोजित बुद्धिबळ स्पर्धेत मनपाच्या क्षेत्रातील एकूण 40 शाळेमधून 550 विद्यार्थी सहभागी झाले आहेत. सन 2025-26 च्या शालेय क्रीडा स्पर्धेत सर्व शाळांनी सहभाग घेण्याचे आवाहन क्रीडा उपयुक्त विक्रम दराडे यांनी या प्रसंगी केले.

# मुंबई नाशीक महामार्गावर भिषण अपघात

## बाप- लेकीचा दुर्दैवी मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
पडघा दि.१८ (प्रतीनीधी)

भिवंडी तालुक्यातील मुंबई नाशिक महामार्गावर एका भिषण अपघातात बाप लेकीचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला असुन मयत व्यक्तीची पत्नी गंभीर जखमी झाली आहे. सईम खोत (४२) मरीयम खोत (६)असे अपघातात ठार झालेल्या बाप -लेकीचे नाव असुन यात मयताची पत्नी गंभीर जखमी झाली असुन हे तिघेही मोटारसायकलने कामानिमित्त भिवंडी येथे जात होते त्यांची मोटारसायकल साईधारा प्रवेशद्वाराजवळील दशमेश पेट्रोलपंपासमोर आली असता त्यांना भरधाव ट्रकने जोरदार धडक दिल्याने त्यात बाप लेकीचा जागीच मृत्यू झाला असुन मयताची पत्नी सुबी खोत ह्या गंभीर जखमी झाल्या असुन त्यांना ज्युपीटर हॉस्पिटल ठाणे येथे दाखल करण्यात आले आहे.

# ठाणे जिल्हा रुग्णालयात रुग्ण सेवेचे नवे पर्व

## सीएसआर उपक्रमांतर्गत जिल्ह्यासाठी कार्डियाक रुग्णवाहिका आणि रक्तसंकलन वाहिनी देणगी स्वरूपात उपलब्ध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.18;** ठाणे जिल्हा रुग्णालयाच्या सेवेत नवे पर्व उजाडले आहे. रोटरी क्लब ऑफ मुंबई, वेस्ट कोस्ट चॅरिटेबल ट्रस्ट गोरेगाव (प.) आणि जीआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत ठाणे जिल्ह्यासाठी एक कार्डियाक रुग्णवाहिका (MH-०४-MH-५३७५) आणि रक्तसंकलन वाहिनी (MH-०४-MH-५६१७) देणगी स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण उपक्रमामुळे जिल्ह्यातील गोरगरीब, आदिवासी व गरजू रुग्णांना आधुनिक वैद्यकीय सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

ही रुग्णवाहिका व रक्तसंकलन वाहिनी दि.17 सप्टेंबर 2025 रोजी 'सेवा पांढरावडा' या राष्ट्रव्यापी उपक्रमांतर्गत 'स्वस्थ नारी - सशक्त भारत' या ध्येय वाक्याखाली यशवंतराव चव्हाण केंद्र येथे भव्य समारंभात हस्तांतरित करण्यात आली.



यासाठी जीआयसीचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी सचिंद्र साळवी, जीआयसीच्या कंपनी सचिव सौ.नूतन सिंह, रोटरी क्लब ऑफ मुंबई वेस्ट कोस्ट चॅरिटेबल ट्रस्ट, गोरेगावचे अब्दुल बैग यांनी पुढाकार घेतला. या मान्यवरांच्या संयुक्त प्रयत्नांतून ठाणे जिल्ह्याच्या आरोग्य सेवेच्या इतिहासात एक सुवर्ण पान लिहिले गेले आहे.

रुग्णवाहिका व रक्तसंकलन वाहिनीची किल्ली जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार व दंत शल्यचिकित्सक डॉ.अर्चना पवार यांच्याकडे मान्यवरांच्या हस्ते सोपविण्यात आली. या सोहळ्यास केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव व केंद्रीय मंत्री रामदास आठवले, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सर्व मान्यवरांचे आभार मानले. ते म्हणाले की, ही साधने केवळ वाहने नाहीत, तर ठाणे जिल्ह्यातील अनेकांचे जीव वाचविण्याचे संकल्प आहेत. या विश्वासाने आम्हाला सक्षम केले असून मानवतेच्या या कार्यात सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीसमोर मी नतमस्तक आहे.

या देणगीमुळे ठाणे जिल्ह्यातील आरोग्यसेवेचा दर्जा आणखी बळकट होणार असून आपत्कालीन वैद्यकीय सेवांसाठी नवसंजीवनी मिळणार आहे. रक्तसंकलन वाहिनीमुळे दुर्गम भागातील गरजू रुग्णांपर्यंत रक्ताचा सुरक्षित पुरवठा सहजतेने पोहोचणार आहे, तर कार्डियाक रुग्णवाहिका हृदयविकारग्रस्त रुग्णांना तातडीची मदत देण्यात मोलाचे योगदान देणार आहे.

हा उपक्रम ठाणे जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा देणारा आणि मानवतेच्या सेवेचा अजरामर ठसा उमटवणारा ठरेल, यात शंका नाही.

## सरपंच रविंद्र विशे यांच्या हस्ते

# पडघ्यात शववाहिका आणि भांडीसंचांचे लोकार्पण





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा दि.१८** (प्रतिनिधी) वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा ग्रामपंचायतीच्या वतीने अत्याधुनिक शववाहिका व भांडी संच लोकार्पण सोहळा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानाचे औचित्य साधून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांच्या वतीने शिवसेना नेते प्रकाश पाटील आमदार शांताराम मोरे यांच्या मार्गदर्शनाने ठाणे जिल्ह्यात पडघा ग्रामपंचायतीला मंजुर झालेल्या पहील्या वातानुकूलित अत्याधुनिक शववाहिकेचे अनावरण पडघा ग्रामपंचायतीचे सरपंच रविंद्र नारायण विशे यांच्या हस्ते करण्यात आले.बाहेरगावी मृतदेह ने-आण करण्यासाठी व स्मशानभूमीत मृतदेह नेण्यासाठी या शववाहिकेचा नागरीकांना उपयोग होणार असुन शववाहिका प्रदान केल्याबद्दल सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत कमिटी ग्रामपंचायत अधीकारी यांनी आरोग्य विभागाचे आभार मानले. तसेच सन २५-२६ ग्रामपंचायत स्वनिधीतील मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या १५ टक्के निधीतून खरेदी करण्यात आलेल्या सार्वजनिक स्वयंपाकासाठी उपयुक्त भांडी संच, मिक्सर, खुर्च्या, पाण्याचे पिंप, अन्न शिजवण्याचे मोठे साठ याचें वाटप रोहीदास नगर मित्रमंडळाच्या महीलांना करण्यात आले.तसेच १० टक्के निधीतून जिल्हा परिषद शाळा संरक्षित भितं, रंगरंगोटी, मुलां, मुलीसाठी बांधण्यात आलेले स्वतंत्र स्वच्छतागृह, शौचालय यां सर्वाचां लोकार्पण सोहळाही यावेळी विवीध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती गुरूनाथ जाधव, उपसरपंच मयुरेश गंधे, माजी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य शैलेश बिडवी, नयना जाधव माजी उपसरपंच व विद्यमान सदस्य अभिषेक नागावेकर, रश्मी तेलवणे,निता दास, सदस्य सायली पाटील, चंदा साळुंखे,अलका मोरे ग्रामपंचायत अधीकारी भास्कर घुडे यांच्यासह माजी सरपंच शशाक तांबोळी, संजय जाधव, संतोष सपाट, गुरूनाथ मोरे, अविनाश दास व ग्रामस्थ, ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.



# आमदार किसन कथोरे

# ठाणे जिल्ह्यातील कणखर कुणबी नेतृत्व!



**दिलीप पवार**
अध्यक्ष- महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई
मुरबाड तालुका

राज्यात सध्यातरी कोणत्याही निवडणुका नसल्या तरी मराठा समाज हा आरक्षणासाठी आंदोलन करत आहे तर दुसरा ओबीसी समाज त्यांचे आरक्षण अबाधित ठेवण्यासाठी संघर्ष करत आहे. त्यामुळे महाराष्ट्रात दोन समाजातील दरी अधिक वाढत चालली असल्याचे चित्र दिसत आहे.

2005 ला अंबरनाथ मतदार संघातून एक वेळा व मुरबाड विधानसभा मतदार संघातून तब्बल चार वेळा आमदार म्हणून निवडून आलेले कुणबी नेतृत्व आमदार किसन कथोरे करत आहेत. मतदार संघाची व्याप्ती तशी खुप मोठी आहे. यामध्ये संपुर्ण मुरबाड तालुका , कल्याण ग्रामीण ,बदलापूर शहर व अंबरनाथ ग्रामीण असा विस्तिर्ण मतदार संघ आहे. 2009 पासून आमदार कथोरे हे नेतृत्व करत आहेत. मतदार संघात अनेक जाती -धर्माचे लोक गुण्या गोविंदाने राहतात. ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात कुणबी समाज मोठा आहे.

परंतु आमदार कथोरे यांनी कधी ही जातीपातीचे राजकारण न करता फक्त विकासाचे काम करत आले असून घरी आलेल्या प्रत्येकाला कधीही जात - पात ,पक्ष न विचारता त्याला न्याय देण्याची भुमिका त्यांची असते. असे असले तरी संपुर्ण ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाचे एकमेव नेतृत्व ते करत असून सर्वच समाज घटकांना सोबत घेऊन मतदार संघाची विकासात्मक बांधणी करत आहेत. यात कुठेही दुजाभाव ते करत नाही. असे असतानाही मंत्रीपद मात्र त्यांना हुलकावणी देत आहे. वास्तवीक त्यांच्या अनुभवाचा फायदा राज्याला झाला असता.परंतु भाजप पक्षश्रेष्ठी तसे करताना दिसत नाही.

मंत्रालयातुन मतदार संघासाठी नविन काय आणता येईल यासाठी त्यांची सदैव धडपड असते. अधिकारी वर्गाशी सलोख्याचे संबंध जोपासले असल्याने निधी आणण्यात त्यांचा हात कोणी धरू शकत नाही.

आपल्या मतदार संघात नव- नविन संकल्पना राबविण्यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील असतात.आपल्या मतदार संघात सुरु केलेली आमदार कन्यादान योजना संपुर्ण राज्यात या योजनेचे स्वागत होत आहे.याज बरोबर नागरिकांना एका छताखाली आणून शासन आपल्या दारी ही महत्वकांक्षी योजना प्रथम मुरबाड मतदार संघात सूरू केली व आज राज्य सरकार राबवित आहे. त्यांच्या कार्यकाळात अनेक अनेक मोठे प्रकल्प मार्गी लागत आहेत. यामध्ये प्रामुख्याने मुरबाड शहराचा झालेला कायापालट, रस्त्यांची कामे असतील , शासकीय कार्यालये, मालशेच घाटातील बहू चर्चित काचेचा पुल, सावर्णे येथिल वारकरी भवन,इतर तिर्थक्षेत्रांचा विकास, संगम येथिल शिवमंदिरासह नव्याने अत्यंत देखणे शिवमंदिर व परिसरातील सुशोभीकरण करण्याचा त्यांचा मानस असून लवकरच ते पुर्ण होईल.असे अनेक प्रकल्प सांगता येतील. प्रत्येकाच्या सुख-दुख्खात सामिल होणारे ,संकट समयी मदतीला धाऊन येणारे, विकासाची दुरदृष्टी असणारे व्यक्तीमत्वाच्या वाढदिवशी त्यांचे हजारो मतदार, चाहते त्यांना शुभेच्छा देण्यासाठी येत असतात हीच त्यांच्या विकास कामांची पावती आहे. हिच खरी माझी संपत्ती आहे असे ते नेहमी सांगत असतात. असो...

साहेबांच्या 19 सप्टेंबर या वाढदिवसा निमित्ताने केलेले छोट्या लेखाचे भावपुष्प मी त्यांना शुभेच्छा म्हणून देत आहे. धन्यवाद ! वाढदिवस अभिष्टचिंतन साहेब.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024